मराठी साहित्य मंडळ, कलबुर्गी (गुलबर्गा)

या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

वर्ष : १० अंक : २

पौष, माघ, फाल्गुन शके १९४५
जानेवारी, फेब्रुवारी, मार्च २०२४

---

मानद संपादक : श्री. पवनकुमार देशपांडे
कार्यकारी संपादक : श्री. सर्वोत्तम सताळकर
निवास (०८४७२) २५५८७८ / ०९२४२१९३७९२

संपादक मंडळ
श्री. विद्याधर मुरुगकर ★ सौ. वंदना किणीकर
डॉ. योगेश्वर देशपांडे ★ सौ. शीतल देऊळगावकर

---

**संस्थेचा पत्ता : मराठी साहित्य मंडळ,** स्टेशन बाजार,
गुलबर्गा (कलबुर्गी) ५८५१०२.
दूरभाष : कार्या. (०८४७२) २३२२०७ email-s.satalkar@yahoo.com
वेळ : सकाळी ८ ते ११ व सायं. ५ ते ८. गुरुवारी साप्ताहिक सुट्टी.

---

या अंकाचे मूल्य : रु. ५०/-
वार्षिक वर्गणी - वैयक्तिक रु. ३००/-, संस्थेसाठी रु. ४००/-
वर्गणी कुठल्याही महिन्यापासून चेक, डीडी अथवा मनीऑर्डरच्या माध्यमाने
'Editor Anubandh' या नावाने पाठवावी.

(संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार, अभिप्रायार्थ भेट पुस्तके, नियतकालिके, प्रसिद्धीसाठी साहित्य इ. कार्यकारी संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावे. प्रसिद्धीसाठी साहित्य ईमेल वरही पाठविता येईल. या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अंतरंग.....


- संपादकीय..... ३
- महाराष्ट्रीय संतांचा 'अध्यात्मनिष्ठ मानवतावाद' / डॉ. श. लोखंडे ६
- अभिजात मुक्तछंद कवी गुरुवर्य प्रा. व्यंकटेश वळसंगकर / डॉ. योगेश्वर देशपांडे ११
- ज्ञानदेवांची गौळण : एक चिंतन / प्रा. डॉ. ज्ञा. स. गवळीकर १७
- कविता प्रांतीचे ठळक नाव : प्रा. व्यंकटेश वळसंगकर / सुनील अंबिके २३
- प्रबोधनकार ठाकरे यांचे अलौकिक व्यक्तिमत्त्व व कार्य / श्री. निलेश भाऊसाहेब वाकचौरे २८
- प्रा. वळसंगकर - साहित्याला समर्पित व्यक्तिमत्त्व / सर्वोत्तम सताळकर ३६
- मराठीतील आत्मचरित्र लेखन : एक आढावा / डॉ. उत्तरेश्वर ज्ञानोबा सुरवसे ४१
- सेंगोल (राजदंड) - न्याय, सत्ता हस्तांतरण आणि सुशासनाचे प्रतीक / डॉ. अनंत दत्तात्रय चिंचुरे ४८
- आठवणींतील गुरुवर्य : व्यंकटेश वळसंगकर सर / द. मा. माने-बेडगेकर ५३
- कविता.... कविता.... कविता.... ५७
- हा संकल्प करणे ही सामाजिक जबाबदारी ! / डॉ. विजय पांढरीपांडे ६१
- एका कर्मयोग्याची हृदयद्रावक कथा - भैय्यासाहेब / डी. बी. जगत्पुरीया ६५
- थंडगार गारवा / सौ. भारती दिलीप सावंत ७१
- तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांचे दाहक जीवनचित्रण करणारी कादंबरी 'वॉन्टेड' / प्रा. डॉ. गणेश लहाने ७६
- संघर्षाला संयमाची झालर असणारे आत्मकथन : 'वळण' / प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात ८८
- मंडळाची वाटचाल..... ९५

# संघर्षाला संयमाची झालर असणारे आत्मकथन : 'वळण'

• प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात

१९६० साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि मराठी महाराष्ट्राची राजभाषा झाली. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मराठी भाषा व संस्कृती यांच्या वृद्धी-समृद्धीसाठी जी काही धोरणे अवलंबली त्यामुळे कला, साहित्य व सांस्कृतिक क्षेत्राला प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे या क्षेत्रांची भरीव पायाभरणी झाली. त्यातूनच लोकसाहित्य, लोकसंस्कृती, लोककला व लोककलांचा अभ्यास तसेच संशोधनाला महत्त्व प्राप्त झाले. वाईचे विश्वकोश निर्मिती कार्यालय हे त्याचाच एक भाग. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याकडे या विभागाचे काम सोपवून चव्हाणसाहेबांनी मराठी भाषिकांसाठी ज्ञानाचे भांडार खुले करून दिले. या कार्यालयात काम करणाऱ्या तिसऱ्या पिढीतील विद्याव्यासंगी साहाय्यक संपादक सरोजकुमार सदाशिव मिठारी यांच्या 'वळण' या आत्मकथनाची डिसेंबर २०२२ मध्ये दुसरी आवृत्ती निघाली. या निमित्ताने हा लेखप्रपंच....

'रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग' असे संत तुकारामांनी १७ व्या शतकात म्हटले आहे. तर 'जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण' असेही दुसऱ्या एका अभंगात म्हटले आहे. महाराष्ट्राचा विचार केल्यास छ. शिवाजी महाराज ते शाहू, फुले, आंबेडकर या सर्वांनाच यातना भोगाव्या लागल्या आहेत. तुकारामांनी 'युद्ध' हा शब्द संघर्षाला अनुसरून वापरलेला आहे. मानवी जीवन जगत असताना प्रत्येकाच्या वाट्याला कमी-अधिक संघर्ष आलेलाच असतो. प्रत्येक पिढीला त्या-त्या काळातील संघर्षाला सामोरे जावेच लागते. १९७० ते ८० या दशकामध्ये जन्मलेली पिढी आता पन्नाशीच्या उंबरठ्यावर उभी आहे. पन्नाशीची उमर गाठायला निघालेल्या या पिढीला अनेक यातनांना सामोरे जावे लागले होते; याचे प्रत्यंतर 'वळण' मधून घडते. सरोजकुमार मिठारी यांनी या यातनांचा उलगडा करताना

संयमाची 'कास' धरलेली आहे. मानवी जीवनातील चढ-उतार चितारणारा हा लेखक मला त्या पिढीचा 'नायक' वाटतो.

एकूण १२ प्रकरणांमध्ये विभागलेले हे आत्मकथन लेखकाच्या बालवाडीच्या शाळाप्रवेशापासून ते तो वाईच्या विश्वकोश निर्मिती कार्यालयात नोकरीमध्ये स्थिर होईपर्यंतचा इतिहास मांडते. 'मराठा' कुटुंबात जन्माला आलेल्या या नायकाने स्वत:च्या बळावर स्वत:चे 'स्वराज्य' निर्माण केले. वाचन, वक्तृत्व, बातमीलेखन, अध्ययन व अध्यापन यांच्या बळावर स्वत:चा जीवनप्रवास यशस्वी केला. 'पाठीवर ऊसाच्या कांडक्याने वळ उठत होते, तरी मी शाळेत जायला तयार नव्हतो.' (पृ. क्र. १५) अशी लेखकाने आत्मकथनाची सुरुवात करून लक्ष्मण माने यांच्या 'उपरा'ची आठवण करून दिली आहे. ऊसाचे टिपरे आणि निरगुडीचा फोक ह्या दोन साधनांमधील फरक सोडला तर; दोघांच्याही पालकांनी त्यांच्या भविष्यासाठी त्यांना शाळेत धाडले, यामध्ये त्या-त्या पिढीच्या पालकांची दूरदृष्टीच दिसून येते. गावशिवारात वाढलेल्या माणसाचे व्यक्तिमत्त्व प्रगल्भ असते; याची प्रचिती मराठीतील आत्मकथनात्मक वाङ्मय वाचताना येते. गाव म्हटले की, रूढी-परंपरा आल्याच. अस्पृश्यता हा तर आपल्या सामाजिक जीवनाला लागलेला डाग आहे. तरीही खेडेगावांतून माणूसपण जपल्याचे प्रत्यंतर मराठी साहित्यातून होताना दिसते. 'वळण'मधील 'फुटक्या कपातून चहा पिणाऱ्या सोनाताईला आता आमच्या कपातूनच चहा मिळू लागला. माणसाला वेगळे वागवणाऱ्या एका वाईट परंपरेला कायमची तिलांजली मिळाली'. (पृ. क्र. २६) या वाक्याने त्याला पुष्टी मिळते. कोल्हापुरातील सुळकूड या आजोळगावच्या रम्य वर्णनात एकरूप झालेल्या लेखकाने त्याच्या बालपणात सामाजिक प्रश्नांकडे कोणत्या दृष्टीने पाहिले याचे दर्शन सदर प्रसंगातून घडते. अशा प्रसंगांबरोबरच लेखकाला 'ब्रदर्स' व 'पेंटर्स' या दोन शब्दांतील नेमका अर्थ न समजल्यामुळे त्याची झालेली फसगत, मामाच्या म्हशी सांभाळतानाचे अनुभव नर्म विनोदाच्या साहाय्याने सांगितले आहेत. सुळकूड व गोकुळ शिरगाव या गावांच्या संस्कारांत वाढलेल्या लेखकाने या गावांविषयी भरभरून लिहिले आहे. 'चित्रनगरी' हे नाव सार्थ ठरविणाऱ्या कोल्हापूरच्या जवळ असणाऱ्या गोकुळ शिरगावमध्ये सिनेमाच्या चित्रीकरणाच्या निमित्ताने अनेक दिग्गज सिनेस्टार येऊन गेल्याचे सांगण्यास लेखक विसरत नाही. शालेय जीवनापासूनच गणिताशी असणारा छत्तीसचा आकडा कसा

निर्माण झाला ? याचा उलगडाही येथे करून दिला आहे. शांता शेळके यांना पन्नास पैकी शून्य मार्क देणारा गणित विषय जसा अवघड वाटायचा तसाच लेखकालाही वाटायचा. बालपणापासूनच या विषयाची त्याने घेतलेली धास्ती पुढील शिक्षणातही अडथळाच ठरते. पुढे लग्नानंतर सहचारिणीकडून गणिताचे धडे घेऊन स्पर्धा परीक्षेत यशस्वी झाल्याची प्रांजळ कबुली लेखक देतो. तो आठवीच्या वर्गात असतानाच शिक्षकांकडून त्याला विनाअनुदानित शिक्षकांच्या व्यथा-वेदनांची ओळख झाल्याने शिक्षण सोडून एम. आय. डी. सी.त कामाला जाण्याचा निश्चय लेखकाने केला. पण आईच्या दक्षतेमुळे व संकपाळदार्जींनी समजूत काढताना 'बाळ, शिकलास तर पुढं चांगले दिवस बघशील, नाहीतर बाबांसारखं फिरायचं नशिबी येईल.' (पृ. क्र. ३७) या वाक्यामुळे 'वळण' घेऊन गाडी रूळावर आली. खुळ्या सदाची मुले म्हणून हिनवलेल्या समाजाला लेखकाने स्वकर्तृत्वाने उत्तरतर दिलेच; पण त्यामागे आईच्या सजगपणाचा हात असल्याचे वाचकाला प्रकर्षाने जाणवते. गावातील मंडळांच्या माध्यमातून गणेशोत्सव, झांजपथक, नाट्यप्रयोग अशा उत्सवांतून मित्रांबरोबर केलेली धमाल, शेतीच्या वाटणीवरून भावकीमध्ये निर्माण झालेला वाद यांचे लेखकाने संयमाने केलेले वर्णन त्याच्या समतोल मनोवृत्तीचे दर्शन घडविते. जमिनीच्या वादानंतरही भावकीशी सामंजस्याने वागणारा सरोज समतामूल्य जोपासणारा वाटतो.

माध्यमिक शाळेतल्या पहिल्या वळणानंतर लेखकाने एम. आय. डी. सी.त काम करत शिकण्यासाठी गोखले कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. रात्रपाळी करून सायकलने प्रवास करताना अपघात झाला, पाय मोडल्याने सक्तीची विश्रांती घ्यावी लागल्याने आयुष्याला पुन्हा 'वळण' मिळाले. गोखले कॉलेजमधील इलेक्ट्रॉनिक्स शाखा सोडून मेन राजाराम कॉलेजमध्ये ११वी कला शाखेत लेखक प्रवेशित झाला. कॉलेजमधील प्रेमप्रकरण वाचकांना कॉलेज जीवनाच्या वातावरणात घेऊन जातात. मैत्रिणीला भेटायला जाताना लेखकाला मित्रांनी दिलेली साथ 'थ्री इडियटस्' चित्रपटाची आठवण करून देते. कॉलेजमधील सर्व कार्यक्रमांत सक्रिय भाग घेऊनही संरक्षणशास्त्र विषयात १०० पैकी ९८ गुण मिळवून बारावी बोर्डात प्रथम क्रमांक पटकावतो व त्या कॉलेजचा तो आदर्श विद्यार्थी होतो. सरोजसारखा एक सामान्य विद्यार्थी येथे रस्ता शोधण्यासाठी येतो आणि आपल्या परिश्रमाने तो स्वत:च इतरांना मार्गदर्शक ठरतो, हे सर्वांसाठीच अभिमानास्पद

आहे. 'आज त्याने 'आदर्श विद्यार्थी' म्हणून पुरस्कार घेतला आहे; पण अशा विद्यार्थ्यांची जागा खाली नसून या व्यासपीठावर आहे. भविष्यात त्याने आपल्या हातून असेच पुरस्कार देण्याची जिद्द ठेवावी.' (पृ. क्र. ७८, ७९) अशी प्रमुख पाहुण्यांची शाबासकीची थाप त्याला दुःख-दैन्य-दारिद्र्य, आईने जोगव्याच्या पिठाच्या बनविलेल्या भाकरीतून भागविलेली भूक, प्रसंगी चिंचेचा पाला खाऊन दिलेली ढेकर हे सारे विसरायला भाग पाडते. तर पुढे उत्कृष्ट भाषणाबद्दल राजीव दीक्षित यांनी 'ये तो महाराष्ट्र का हिरा है' अशी दिलखुलासपणे दिलेली दाद, लेखकाचे बळ वाढविते. बारावीला ७२ टक्के गुण मिळाल्याने डी. एड. करून शिक्षक बनण्याची मनीषा बाळगणाऱ्या नायकाच्या मनात स्पर्धा परीक्षा देण्याचे बीज याच दिवसांत पेरले; जे पुढे विश्वकोश निर्मिती कार्यालयातील नोकरीने फलद्रूप झाले. अडथळे पार करत-करत 'पेटाळा कॉलेज' मध्ये डी. एड.साठी प्रवेशही मिळाला. वक्तृत्वाच्या जोरावर व्यक्तिमत्त्वाला झळाळी प्राप्त करून देणाऱ्या नायकाच्या जीवनाची फरफट मात्र थांबताना दिसत न्हवती. नायकाच्या वडिलांना कुष्ठरोग होतो त्या वेळी नायक म्हणतो, 'कोणाच्या वाळल्या पाचोळ्यावर कधी पाय न ठेवलेला, आयुष्यभर ढोरासारखे राबलेला माझा बा आज अशा एका रोगाला बळी पडला होता.' (पृ. क्र. ११७) या प्रसंगात नायकाचा धीरोदात्तपणा व प्रामाणिकपणा वाचकांना प्रकर्षाने जाणवतो. हा प्रसंग लेखकाला वाचकांपासून लपवताही आला असता; पण लेखक नारायण सुर्व्यांसारखा अंतर्बाह्य निखळ व निकोप असल्याने कसलीही लपवा-छपवी करत नाही. वडिलांची शुश्रूषा करताना तो म्हणतोही, 'डी. एड. शिक्षणाबरोबर माझे इकडे जीवनशिक्षणही सुरू होते.' (पृ. क्र. १२२) जन्मदात्याला या आजारातून बाहेर काढण्यासाठी नायकाचे अंतर्बाह्य युद्ध वाचकांना हेलावून सोडते. असाध्य रोगाने पछाडले म्हणून दवाखान्यात बेवारस म्हणून पालकांना सोडून जाणारे नातेवाईक व 'मी वडिलांना न्यायला कधी येऊ' असे डॉक्टरांना जिव्हाळ्याने विचारणारा नायक यांच्यात जमीन-अस्मानाचे अंतर असल्याचे दिसून येते. आपुलकी, प्रेम, जिव्हाळा यांच्या बळावर कुष्ठरोगावर मात करून नायक आपल्या वडिलांना बरे करून घरी आणतो, तेव्हा त्याच्या धैर्याला 'सलाम' करावासा वाटतो. येथे नायक म्हणतो, 'बाबा आमटे, प्रकाश आमटे यांचे काम ऐकायला अनेकांना आवडते, छान वाटते; पण वास्तव परिस्थिती स्वत:वर बेतली, तर ते आव्हान स्वीकारण्याची अनेकांची तयारी

नसते, हेही तितकेच खरे. म्हणून शालेय शिक्षणाबरोबर लोकशिक्षणही खूप गरजेचे आहे.' (पृ. क्र. १७७)

'वळण' घेत-घेत नायकाच्या जीवनाची गाडी शिक्षक म्हणून ना. पा. विद्यालयात कमी पगारावर व पुढे विनाअनुदानित असलेल्या विठाबाई पाटील विद्यालयात स्थिर झाली. शाळेला अनुदान नसले तरी एक हाडाचा शिक्षक म्हणून तो १०० टक्के योगदान देत राहिला; त्याच्या या प्रामाणिकपणाचे फळ त्याला पुढे मिळाले. त्याच्या वागण्यातून त्याने 'परिश्रम घ्या, प्रामाणिक राहा आणि माणूस व्हा.' हा संदेश विद्यार्थ्यांना दिला. अध्यापनासोबतच पत्रकारिता करतानाही अनेक सामाजिक प्रश्नांना त्याने वाचा फोडली. खोट्या सह्या घेऊन ग्रामसभा झाल्याचे दाखविणारा ग्रामसेवक, कणेरी हायस्कूलमधील कॉपी प्रकरण, भोंदुगिरी करणाऱ्या संतोष नावाच्या भामट्याचे प्रकरण, दगडखाणीत काम करणाऱ्या कानडी दाम्पत्याच्या एकुलत्या एक मुलाच्या मृत्यूचे प्रकरण अशा अनेक प्रकरणांना निर्भीडपणे वाचा फोडली. तर कणेरी गावातील टी. व्ही. बंद उपक्रमाला राज्यभर मिळवून दिलेली प्रसिद्धी अशा अनेक बातम्यांमुळे नायक नावारूपाला आला. या कामामुळेच नायकाचा 'करवीर पत्रकार संघाचा अध्यक्ष' म्हणून गौरव झाला. यातून लेखकाची जिद्द, चिकाटी, सचोटी, सामाजिक तळमळ दिसून येते. याच काळात लेखकाला स्वतःच्या वडिलांच्या बेपत्ता होण्याची बातमी वर्तमानपत्रात द्यावी लागते, त्या वेळी त्याच्या मनाची झालेली उलघाल तो प्रसंग वाचताना वाचकांना जाणवते. बातमीलेखनाच्या कौशल्यामुळेच स्वतःचे साप्ताहिक चालू करण्याचा निश्चयही त्याने केला होता; पण येथे त्याच्या जीवनाने 'वळण' घेतले; आणि तो वाईला आला.

'घर पाहावे बांधून' अशी आपल्याकडे एक प्रचलित म्हण आहे. घर, लग्न व विहीर या तीन गोष्टींसाठी जीवाचे 'रान' करावे लागते. हे कमी-अधिक प्रमाणात प्रत्येकाने अनुभवलेले असते. लेखकाचा घर आणि लग्नाबाबतचा अनुभव जीवनाला 'वळण' देणारा आहे. उदय नावाच्या बालमित्राने त्याला घर बांधून दिले आहे. पुढे त्याचे पैसे लेखकाने फेडलेही आणि त्याच्या ऋणातून उतराई होण्यासाठी घराला सूरज (लेखकाला कॉलेजचे मित्र सूरज म्हणत) + उदय = 'सूर्योदय' असे नाव दिले. लेखकाच्या लग्नाबाबतही परिस्थितीने असेच 'वळण' घेतले. जीवनात स्थिर होण्यासाठी धडपडणाऱ्या लेखकाला लग्नासाठी स्थळ आले.

त्याच्या विद्यमान सासऱ्यांनी 'सरोजची सगळी परिस्थिती आम्हाला माहिती आहे आणि त्याच्या हिमतीवरही आमचा विश्वास आहे,' (पृ. क्र. १६१) असे म्हणून त्याच्यावर विश्वास टाकला. लेखकानेही नियोजित वधूला (शिल्पा) सर्व परिस्थितीची जाणीव करून दिली आणि त्यांचा सुखाचा संसार सुरू झाला. त्यांच्या संसारवेलीला केतकी आणि उत्कर्ष अशी दोन फुलेही आली आहेत. 'नवऱ्याचे पीठ आणि बायकोचे मीठ यांचे मेतकूट जर जमले; तर संसार फुलतो' याचे उत्तम उदाहरण म्हणजे हे दाम्पत्य आहे. संसार सांभाळत आत्मकथनाच्या नायिकेने सासू-सासरे यांची सेवा, खाजगी शिकवणी व नवऱ्याचे गणिताध्ययन घ्यायला सुरुवात केली. म. फुल्यांनी सावित्रीबाईंना शिकविले तसे या आधुनिक सावित्रीने सरोजचे गणित पक्के केले. फुले दाम्पत्याच्या शिक्षणध्यासाची ही फलश्रुती आहे असे म्हणावयास हरकत नाही. सहचारिणीच्या गणिताध्ययनाचा लाभ लेखकाला विश्वकोशाची परीक्षा देताना झाला. स्पर्धा परीक्षा, मुलाखत हा भाग वाचताना वाचकांना विश्वास नांगरे-पाटलांच्या 'मन में है विश्वास' या आत्मकथनाची आठवण होते. दोन्ही आत्मकथनांमध्ये याबाबत बरेच साधर्म्य आहे. २ एप्रिल २०११ ला क्रिकेट विश्वचषकाचा भारत-श्रीलंका यांचा मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवरील अंतिम सामना व त्याच मुंबापुरीत लेखकाचा आयुष्याचा सामना याची लेखकाने छान सांगड घातली आहे. लेखक म्हणतो, 'मुंबईत दोन महत्त्वाचे सामने होते. एक, भारतीय क्रिकेट संघ विश्वचषक जिंकण्यासाठी मुंबईच्या वानखेडे मैदानावर झुंजणार होता आणि दुसरा, माझ्या आयुष्याचा सामना, जो माझ्या मुलाखतीतील यशावर ठरणार होता. जगाचे लक्ष क्रिकेटच्या सामन्याकडे होते, माझे लक्ष माझ्या भाकरीकडे.' (पृ. क्र. १७८) अखेर हा सामना लेखकाने जिंकला आणि तो विश्वकोशात रुजू झाला.

आत्मकथन वाचताना पानोपानी 'वळण' हे शीर्षक सार्थ असल्याचे जाणवते. डॉ. सुनीलकुमार लवटे यांची प्रस्तावना व राजा दीक्षित यांनी केलेली पाठराखण वाचल्यास 'वळण'चा नायक उलगडतो, हे या दोघांच्या अभ्यासपूर्ण लेखनाचे यश म्हणावे लागेल. ऐंशीच्या दशकातील पिढीवरील चित्रपटांचा असणारा प्रभाव लेखकावरही दिसतो. त्या वेळच्या संस्कारक्षम चित्रपटांमुळेच नायकाची भूमिका संतुलित राहिली असावी, असे वाटते. तसेच वाचनाचे वेड व त्याला वक्तृत्वाची जोड मिळाल्याने लेखकाचे व्यक्तिमत्त्व खुलले आहे.

कुसुमाग्रजांच्या 'कणा' कवितेने लेखकाला घडविले आहे. त्यामुळे मराठी साहित्याचे मोल येथे अधोरेखित होते. मुखपृष्ठावरील वळणावळणाची वाट, शिवार, झाडे, पक्षी हे कोल्हापूर परिसराशी वाचकांना जोडते. तर सूर्याची छटा सूरजरूपी नायकाशी जणू संवाद साधतेय असेच वाटते. हे पुस्तक आबालवृद्धांनी वाचावे असेच आहे. किशोरवयीन विद्यार्थ्यांपासून वृद्धांपर्यंत व पुरुषांपासून महिलांपर्यंत प्रत्येकाला त्यातून 'ऊर्जा' मिळेल. 'थ्री इडियटस्' चित्रपटातील राजू व फरान आपल्या मित्राचे नाव गुणवत्तायादीत जसे खालून पाहतात; तसेच 'वळण'चा नायकही विश्वकोशाच्या मुलाखतीवेळी स्वत:चे नाव खालून शोधताना दिसतो; पण त्याचे नाव रांचोप्रमाणे यादीत प्रथम क्रमांकावर असते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्याने स्वकर्तृत्वाच्या जोरावर मिळविलेले हे यश खेड्यातील तरुणांना प्रेरणादायी आहे. तर 'वळण'च्या नायिकेमध्ये महिला स्वत:ला पाहू शकतात. एकंदर पाहिले तर हे आत्मकथन वाचून अनेकांच्या जीवनाला यशस्वी 'वळण' मिळेल, हे मात्र नक्की.

**वळण**

- सरोजकुमार सदाशिव मिठारी

प्रकाशक : भाग्यश्री प्रकाशन, कोल्हापूर

पृष्ठसंख्या : १८२

मूल्य : २५० रु.

**- प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात**

सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,

किसन वीर महाविद्यालय,

वाई, जि. सातारा.

संपर्क क्र. : ९६०४०४६०८४

★ ★ ★